# महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई

## राज्य सेवा [मुख्य] परीक्षा-२०१५ – अंतिम निकाल

**घोषणा**

आयोगातर्फे **राज्य सेवा [मुख्य] परीक्षा-२०१५** चा अंतिम निकाल आयोगाने दिनांक **५ एप्रिल, २०१६** रोजी जाहिर केला असून, राज्यभरातील एकूण ३६८ राजपत्रित अधिकाऱ्यांच्या पदांसाठी यशस्वी उमेदवारांची यादी जाहिर करण्यात आली आहे. यामध्ये **गट-अ** चे ७२ व **गट-ब** चे २९६ अधिकारी पदांसाठी शिफारशी केल्या आहेत. या परीक्षेत अहमदनगर जिल्ह्यातील **श्री. कानडे अतुल अनिल** हे राज्यात आणि मागासवर्गीय उमेदवारांमधून प्रथम आले आहेत. **श्री. कानडे** हे **अभियांत्रिकी** [B.E.] **पदवीधर** आहेत. श्री. कानडे यांची **अधीक्षक**, **राज्य उत्पादन शुल्क**, **गट-अ** पदाकरिता निवड झाली आहे. महिला वर्गवारीतून राज्यात **पुणे** जिल्ह्यातील **श्रीमती नऱ्हे रोहिणी दत्तात्रय** ह्या प्रथम आल्या आहेत. त्या अमागास वर्गवारीतील आहेत. **श्रीमती नऱ्हे** ह्या **तंत्रशास्त्र** [B. Tech] **पदवीधर** आहेत. त्यांची **नायब तहसिलदार**, **गट-ब** पदाकरिता निवड झाली आहे.

२. राज्य सेवा [पूर्व] परीक्षा-२०१५ दिनांक ५ फेब्रुवारी, २०१५ रोजी मुंबईसह राज्यातील ३६ जिल्हा केंद्रांवर घेण्यात आली होती. सदर परीक्षेत एकूण **१,७०,२३७** उमेदवारांना प्रवेश देण्यात आला होता. पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे एकूण **४, ७२२** उमेदवारांना मुख्य परीक्षा देण्याकरिता यशस्वी ठरले होते व मुख्य परीक्षा दिनांक १२ ते १४ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत मुंबईसह औरंगाबाद, नागपूर व पुणे या चार जिल्हा केंद्रांवर घेण्यात आली होती. सदर मुख्य परीक्षेच्या निकालाआधारे एकूण **११३८** उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात आले होते. सदर मुलाखती दिनांक २६ फेब्रुवारी ते १२ मार्च, २०१६ या कालावधीत घेवून अंतिम निकाल दिनांक **५ एप्रिल, २०१६** रोजी जाहिर करण्यात आला आहे.

**३. सदर निकालाआधारे १०८ महिला उमेदवारांची व ६ अपंग उमेदवारांची शासनाकडे शिफारस करण्यात आली आहे.**

**विजया पडते**
**उपसचिव,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग.**

**ठिकाण: मुंबई**
**दिनांक - ५ एप्रिल, २०१६**